	M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.		महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.	स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.मुंविमं/माध्य.प्रात्य./३०४/ २५५९
नवी मुंबई-४००७०३
दि.२४/०६/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक/ मुख्याध्यापिका
सर्व मान्यताप्राप्त शाळा
जिल्हा मुंबई/ठाणे/पालघर/रायगड

विषय:- जून-जुलै २०२५ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेतील पूर्व व्यावसायिक विषयांच्या (X-1,91,92,93) प्रात्यक्षिक परीक्षेबाबत...

संदर्भ:- १) क्र.रा.मं./परीक्षा ३/२१३२ दि. १३ /०६/२०२५

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, जून-जुलै २०२५ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी पूर्व व्यावसायिक विषयाच्या, X-1,91,92,93 या विषयास प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा (Practical Exam) प्रचलित पध्दतीनुसार घेण्यात येणार आहेत. सदर विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम (X-1,91,92,93) या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा दि.२४ जून २०२५ ते ०८ जुलै २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे.
२. आपल्या शाळेतील विषय क्र.X-1,91,92,93 हे विषय शिकवणा-या शिक्षकांना आपल्या स्तरावर सदर विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेकरीता अंतर्गत परीक्षक(Internal Examiner) म्हणून नेमणुक करावी व त्याची प्रत मुंबई विभागीय मंडळ कार्यालयास त्वरीत पाठवावी.
३. वरील विषयांच्या प्रात्यक्षिक मुल्यमापनाच्या गुणांची नोंद मार्च-एप्रिल २०२५ च्या परीक्षेप्रमाणेच Online पध्दतीने करावी तसेच ऑनलाईन गुणतक्ते मंडळ कार्यालयात जमा करावेत.

४. सदर विषयाच्या बहि:स्थ परीक्षकांची (External Examiner) नियुक्ती महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद कार्यालयामार्फत(MSCVT) करण्यात येणार आहे.

५. परीक्षा कालावधी मर्यादित असल्याने X-1,91,92,93 या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी OUT OF TURN ने स्वतंत्र कालावधी देण्यात येणार नाही.

६. सदर विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणारी आवश्यक ती स्टेशनरी विद्यार्थी संख्येनुसार मुंबई विभागीय मंडळ वाशी येथून घेण्यात यावी

पुढील परीक्षेसंदर्भातील कार्यवाही MSCVT कार्यालयाच्या सूचनेप्रमाणे करावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव (प्र)
मुंबई विभागीय मंडळ
नवी मुंबई, वाशी ४००७०३